ePaper

## देशभरात पुन्हा कोरोनाचे थैमान, 24 तासांत 7 मृत्यू

| वर्ष - 8 | अंक - 299 | UDYAM-MH-26-0158827 |



# महाईन्यूज™

**आतील पानांत**

- चेंगराचेंगरीनंतर RCB कडून निवेदन
- श्रीलंकेचा माजी खेळाडू अडचणीत!
- लोक मरत असताना उत्सव सुरू होता
- इन्फ्लुएन्सर शर्मिष्ठा पनोलीला दिलासा!

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 6 जून 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चेला उधाण, दोन्ही पक्षांचे ज्येष्ठ नेते पूर्णपणे अनुकूल..

# उद्धव-राज ठाकरेंचे मनोमीलन होणार ?

## ठाकरेंची पुढील पिढी एकत्रीकरणास सकारात्मक, चेंडू राज यांच्या कोर्टात!

। मुंबई । प्रतिनिधी । महाईन्यूज

**स्थानिक स्वराज्य संस्था, महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून उद्धव ठाकरे यांची शिवसेना (उबाठा गट) आणि राज ठाकरे यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे एकत्रीकरण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. त्या दृष्टीने दोन्ही बाजूंकडून सकारात्मक पावले टाकली जात आहेत. असे घडले तर तो राजकारणातील एक 'मैलाचा दगड' ठरेल.**



### उद्धव गटाचा हिरवा कंदील..

ठाकरे बंधू एकत्र येतील का नाही? याबाबत गेले काही महिने नुसत्या चर्चा होत होत्या आणि दोघांमध्ये काहीही संवाद नव्हता, फक्त सोशल मीडिया आणि त्यांच्यातील तिसरी-चौथी फळी या चर्चा घडवून आणत होते. आता मात्र, एकत्र येण्यास उद्धव ठाकरे यांच्या गटाने होकार दिला असून राज ठाकरे काय निर्णय घेतात, याकडे अवघ्या राजकीय विश्लेषकांचे लक्ष लागले आहे.

### पुढील पिढी सकारात्मक..

उद्धव यांचे चिरंजीव आदित्य आणि राज ठाकरे यांचे चिरंजीव अमित हे दोघेही राजकारणात सक्रिय असून त्यांच्या मतांना मोठा मान देखील आहे. अमित ठाकरे यांनी सांगून टाकले की दोन्ही भावांकडे मोबाईल आहे, त्यामुळे ते कोणत्याही क्षणी एकमेकांशी बोलू शकतात आणि दोन्ही पक्षांचे, विशेषतः ठाकरे घराण्याचे भवितव्य ठरवू शकतात. दोघांच्या मनोमीलनाची चर्चा कोणी सोशल मीडियावर करू नये, असा टोला त्यांनी संजय राऊत यांना लावला आहे.

### दोन्हीकडील प्रवक्त्यांची लुडबूड नको..

दरम्यान, उबाठा गटाचे प्रवक्ते संजय राऊत किंवा सुषमा अंधारे तसेच मनसेचे प्रवक्ते संदीप देशपांडे यांनी या एकत्रीकरणाबाबत काहीही मते व्यक्त करू नयेत, असा सज्जड दम ठाकरे बंधूंनी त्यांना भरलेला असल्यामुळे इतर नेत्यांमध्येच फक्त चर्चा सुरू आहे.

### दोन्ही बाजूचे उत्साही कार्यकर्ते एकत्र..

दोन्ही पक्षांच्या उत्साही कार्यकर्त्यांनी ठाणे, डोंबिवली, कल्याणमध्ये जुळवून घेतल्याचे चित्र आहे. उबाठा गट आणि मनसे एकत्र येण्याची चर्चा सुरू असतानाच तिकडे नाशकात दोन्ही ठाकरेंच्या कार्यकर्त्यांचे मनोमीलनही झाल्याचे दिसून आले. तेथे मनसे कार्यालयाच्या उद्घाटनाला उद्धव यांच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती लावल्याचे दिसले. ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख डी. जी. सूर्यवंशींसह अनेक पदाधिकारी मनसे कार्यालयात उपस्थित राहिले. त्यामुळे ठाणे, कल्याण, डोंबिवलीनंतर आता नाशकातही दोन्ही ठाकेरेंचे कार्यकर्ते मनाने एकत्र आले आहेत, असे मानायला हरकत नाही.

### दोन्ही गटांकडून फलकाद्वारे संदेश..

नाशिकमध्ये ठाकरे गट आणि मनसेच्या कार्यकर्त्यांनी एक फोटोही आणला होता. त्यामध्ये 'हिंदुत्व आणि ठाकरे म्हणजे महाराष्ट्र' असा उल्लेख केला होता. या फोटोवर उद्धव आणि राज ठाकरेंचा फोटो लावण्यात आला होता. दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाचा संदेश देणारा हा फलक विशेष लक्ष वेधून घेत होता. काही ठिकाणी उद्धव, राज यांच्या खांद्यावर हात ठेवलेले शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असे फलकही लावण्यात आले आहेत.

### भाजपाकडून हिंदुत्वाचा अपमान..

भारतीय जनता पार्टीने हिंदुत्व, हिंदुत्व करत हिंदुत्वाचा अपमान केला असल्याचा आरोप यावेळी नाशिकच्या ठाकरेंच्या कार्यकर्त्यांनी केला. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी एकत्र येणे ही महाराष्ट्राची गरज असल्याचे मतही या वेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. मराठी माणसाच्या हितासाठी या दोन्ही नेत्यांनी एकत्र यावे, हीच सर्वसामान्य माणसाची आणि कार्यकर्त्यांची भावना असल्याचे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

### अमित ठाकरेंचा महत्त्वाचा सल्ला..

महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सध्या चर्चा रंगली आहे ती म्हणजे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येणार का? दोन्ही पक्षाच्या अनेक नेत्यांनी तसे संकेतही दिलेत. अशातच आता ज्युनियर ठाकरेंही, संभाव्य 'युती' वर व्यक्त होऊ लागले आहेत. दोन दिवसांपूर्वी आदित्य ठाकरेंनी सकारात्मक प्रतिक्रिया दिल्यानंतर राज ठाकरेंचे चिरंजीव अमित ठाकरेंनीही, एकत्र येण्यावर काहीच हरकत नसल्याचे सूचक वक्तव्य केले. त्यांनी या आधी मनसेकडून दोनवेळा तसा प्रयत्न झाल्याची आठवण करून दिली. आता दोन्ही नेत्यांची इच्छा असेल तर एकमेकांना फोन करावा, असा सल्ला त्यांनी दिला. त्यामुळे उत्सुकता लागून असलेल्या ठाकरे बंधुंचा, युतीबाबतचा अंतिम निर्णय काय होतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### दुसऱ्या क्रमांकाच्या फळीत उत्साह!

ठाकरे बंधू एकत्र येणार या कल्पनेने दोन्ही पक्षातील दुसरी फळी मात्र चांगलीच आनंदी झाली आहे. महाराष्ट्राचे संपूर्ण राजकारण यामुळे फिरेल आणि 'ठाकरे ब्रँड' म्हणजे काय हे महाराष्ट्र अनुभवेल, असे या नेत्यांचे म्हणणे आहे. मुंबई महानगरपालिका दोघे एकत्र आले तरच ते जिंकू शकतात, असा सर्व्हे आल्यामुळे दोघांच्या एकत्रीकरणाला आता चालना मिळाली आहे.

### इतरांची पोपटपंची : ठाकरे बंधू गप्पच!

उद्धव आणि राज ठाकरे एकत्र येण्यावर इतरांनीच पतंग उडविण्यास सुरुवात केली आहे. प्रत्यक्षात, दोन्ही ठाकरे बंधू मात्र गप्पच आहे त्यांच्याकडून कोणतेही स्पष्ट अनुकूल उद्गार आले नाहीत. यामध्ये आता महत्त्वाची भूमिका आहे ती राज ठाकरे यांची ! कारण, गेल्या काही दिवसात त्यांना 'महायुती'चे अनेक नेते भेटून गेले असल्यामुळे आणि त्यांच्याशी सविस्तर चर्चा झाल्या असल्यामुळे त्यांचा कल हा 'महायुती' कडे तर नाही ना? असा एक सूर राजकीय विश्लेषकांकडून येत आहे.

# क्रीडांगण आरक्षणाची जागा ताब्यात घ्यावी!

## ‘आपले पुणे’ संस्थेची पालिकेकडे मागणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्वेनगर येथील नवसह्याद्री सोसायटीच्या जवळ क्रीडांगणाचे आरक्षण असलेली जागा पुणे महापालिकेने तातडीने ताब्यात घ्यावी, अशी मागणी ‘आपले पुणे’ संस्थेने केली आहे. ‘महापालिकेने ही जागा ताब्यात घेऊन येथे क्रीडांगण विकसित केले, तर कोथरूड भागातील युवकांना चांगली सुविधा उपलब्ध होईल,’ असे संस्थेचे उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी, प्रशांत बधे यांनी सांगितले.**



संस्थेच्या वतीने याबाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यात आले असून, त्यामध्ये ही मागणी करण्यात आली आहे.महापालिकेच्या विकास आराखड्यात (डीपी) व सह्याद्री शैलेश सोसायटीच्या लगत एका क्रीडांगणाचे आरक्षण आहे. ही आरक्षणाची जागा एका बांधकाम व्यावसायिकाने विकत घेतली आहे. या जागेभोवती पत्र्याचे कंपाउंड टाकले आहे. मात्र, या बांधकाम व्यावसायिकाकडे याची कागदपत्रे उपलब्ध नाहीत, असे आयुक्तांना दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे.‘ही जागा सुमारे चार एकर असून, ती ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने कलम चार आणि सहा याचा वापर करावा. भूसंपादन अधिकाऱ्याकडे पैसे भरून पंचनामा करून हा भूखंड ताब्यात घ्यावा. यासाठी स्वतंत्र बैठक घेणे आवश्यक आहे. महापालिकेने यापूर्वी शहीद मेजर प्रदीप ताथवडे उद्यानाची जागादेखील एका मोठ्या बांधकाम व्यावसायिकाकडून पैसे भरून ताब्यात घेतली होती. त्याच पद्धतीने पावले उचलून ही जागा ताब्यात घ्यावी,’ अशी मागणी ‘आपले पुणे’च्या वतीने करण्यात आली आहे. संस्थेच्या वतीने याबाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यात आले असून, त्यामध्ये ही मागणी करण्यात आली आहे.महापालिकेच्या विकास आराखड्यात (डीपी) व सह्याद्री शैलेश सोसायटीच्या लगत एका क्रीडांगणाचे आरक्षण आहे. ही आरक्षणाची जागा एका बांधकाम व्यावसायिकाने विकत घेतली आहे. या जागेभोवती पत्र्याचे कंपाउंड टाकले आहे. मात्र, या बांधकाम व्यावसायिकाकडे याची कागदपत्रे उपलब्ध नाहीत, असे आयुक्तांना दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे.‘ही जागा सुमारे चार एकर असून, ती ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने कलम चार आणि सहा याचा वापर करावा. भूसंपादन अधिकाऱ्याकडे पैसे भरून पंचनामा करून हा भूखंड ताब्यात घ्यावा. यासाठी स्वतंत्र बैठक घेणे आवश्यक आहे. कर्वेनगर येथील नवसह्याद्री सोसायटीच्या जवळ क्रीडांगणाचे आरक्षण असलेली जागा पुणे महापालिकेने तातडीने ताब्यात घ्यावी, अशी मागणी ‘आपले पुणे’ संस्थेने केली आहे.

‘महापालिकेने ही जागा ताब्यात घेऊन येथे क्रीडांगण विकसित केले, तर कोथरूड भागातील युवकांना चांगली सुविधा उपलब्ध होईल,’ असे संस्थेचे उज्वल केसकर, सुहास कुलकर्णी, प्रशांत बधे यांनी सांगितले.महापालिकेने यापूर्वी शहीद मेजर प्रदीप ताथवडे उद्यानाची जागादेखील एका मोठ्या बांधकाम व्यावसायिकाकडून पैसे भरून ताब्यात घेतली होती.

### नवल किशोर राम यांना निवेदन

या बांधकाम व्यावसायिकाकडे याची कागदपत्रे उपलब्ध नाहीत, असे आयुक्तांना दिलेल्या निवेदनामध्ये म्हटले आहे.‘ही जागा सुमारे चार एकर असून, ती ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने कलम चार आणि सहा याचा वापर करावा. भूसंपादन अधिकाऱ्याकडे पैसे भरून पंचनामा करून हा भूखंड ताब्यात घ्यावा. यासाठी स्वतंत्र बैठक घेणे आवश्यक आहे.संस्थेच्या वतीने याबाबत महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांना निवेदन देण्यात आले असून, त्यामध्ये ही मागणी करण्यात आली आहे.महापालिकेच्या विकास आराखड्यात (डीपी) व सह्याद्री शैलेश सोसायटीच्या लगत एका क्रीडांगणाचे आरक्षण आहे. ही आरक्षणाची जागा एका बांधकाम व्यावसायिकाने विकत घेतली.

# तीस हजार विद्यार्थ्यांची प्रवेशाकडे पाठ!

## पुणे विभागात 2 लाख 19 हजार 153 विद्यार्थ्यांची नोंदणी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**इयत्ता अकरावी प्रवेशासाठी राबवण्यात येत असलेल्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील नोंदणीची मुदत गुरुवारी संपली. या मुदतीत पुणे विभागातील २ लाख १९ हजार १५३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, विभागातून दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ३० हजार विद्यार्थ्यांनी अकरावीच्या प्रवेशासाठी नोंदणीही केली नसल्याचे दिसून येते.**




शिक्षण विभागाने अकरावीच्या नोंदणीबाबतची माहिती दिली. अकरावी प्रवेशासाठी ३ जूनपर्यंत मुदत देण्यात आली होती. अल्पसंख्याक आणि इनहाउस कोटा प्रवेशात केलेल्या बदलांमुळे नोंदणीसाठी ५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. पुणे विभागात एकूण २ लाख १९ हजार १५४ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली. पुणे विभागात पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. पुणे विभागातील नोंदणीत पुणे जिल्ह्यातील १ लाख १९ हजार ८५३, अहिल्यानगर जिल्ह्यातील ५२ हजार २३२, सोलापूर जिल्ह्यातील ४७ हजार ६९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.यंदा राज्य मंडळाच्या पुणे विभागात दहावीच्या २ लाख ६३ हजार १५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी २ लाख ४९ हजार ५०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. दहावीनंतर विद्यार्थी अकरावी प्रवेशासह आयटीआय, अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांनाही पसंती देतात. त्यामुळे पुणे विभागातील उत्तीर्ण झालेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी २ लाख १९ हजार १५४ विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशासाठी नोंदणी केली, तर सुमारे ३० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली नसल्याचे दिसून येत आहे. शिक्षण विभागाने अकरावीच्या नोंदणीबाबतची माहिती दिली. अकरावी प्रवेशासाठी ३ जूनपर्यंत मुदत देण्यात आली होती. अल्पसंख्याक आणि इनहाउस कोटा प्रवेशात केलेल्या बदलांमुळे नोंदणीसाठी ५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. पुणे विभागात एकूण २ लाख १९ हजार १५४ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली. पुणे विभागात पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर या जिल्ह्यांचा समावेश होतो. पुणे विभागातील नोंदणीत पुणे जिल्ह्यातील १ लाख १९ हजार ८५३, अहिल्यानगर जिल्ह्यातील ५२ हजार २३२, सोलापूर जिल्ह्यातील ४७ हजार ६९ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.यंदा राज्य मंडळाच्या पुणे विभागात दहावीच्या २ लाख ६३ हजार १५४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती, त्यापैकी २ लाख ४९ हजार ५०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. दहावीनंतर विद्यार्थी अकरावी प्रवेशासह आयटीआय, अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांनाही पसंती देतात. त्यामुळे पुणे विभागातील उत्तीर्ण झालेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी २ लाख १९ हजार १५४ विद्यार्थ्यांनी अकरावी प्रवेशासाठी नोंदणी केली.

### ऑनलाइन नोंदणीची मुदत संपली

३० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली नसल्याचे दिसून येत आहे.इयत्ता अकरावी प्रवेशासाठी राबवण्यात येत असलेल्या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील नोंदणीची मुदत गुरुवारी संपली.विभागातून दहावी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी सुमारे ३० हजार विद्यार्थ्यांनी अकरावीच्या प्रवेशासाठी नोंदणीही केली नसल्याचे दिसून येते.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# पिंपरी चिंचवडमधील प्रवाशांची 'सरकारमान्य' लूट

## बसच्या मनमानी भाड्यामुळे प्रवाशांच्या खिशाला चाट

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सुट्ट्यांचा हंगाम सुरु झाला की, नागरिकांना मूळ गावी जाण्याचे किंवा नातेवाईकांना भेटण्यासाठी अथवा पर्यटनाला जाण्याचे वेध लागतात. ह्या काळात रेल्वेला असलेली गर्दी, प्रतीक्षा यादी बघता सामान्य नागरिक हा खासगी प्रवासी बसद्वारे प्रवासाला प्राधान्य देतो. मात्र ,नेमकी प्रवाश्यांची ही गरज ओळखून खासगी बस मालकांनी प्रचंड भाडेवाढ केली आहे. यातून ग्राहकांची पिळवणूक आणि लूटमार सुरू आहे.**



दरम्यान, जास्त भाडे आकारणी करणाऱ्या बसचालक, मालक आणि कंपन्यांविरुद्ध कारवाई करण्यात आरटीओ आखडता हात घेत असल्याने प्रवाशांची चक्क 'सरकारमान्य' लूट सुरू आहे.पिंपरी-चिंचवड ही कामगार, कष्टकऱ्यांची नगरी म्हणून ओळखली जाते. राज्याच्या तसेच परराज्यातील कानाकोपऱ्यातून लाखोंच्या संख्येने चाकरमानी उद्योगनगरीत वास्तव्यास आहेत. दिवाळी तसेच उन्हाळ्यात मुलांना शाळेला सुटी लागत असल्याने अनेक जण कुटूंबासह गावी जाण्यास प्राधान्य देतात. शहरातून मूळगावी जाणाऱ्या प्रवाशांमध्ये विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रवाशांची संख्या अधिक आहे. मुख्यत्वे दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीच्या काळात ही संख्या खूप मोठी असते. उन्हाळी सुट्टीच्या पार्श्वभूमीवर रेल्वेचे बुकिंग फुल्ल झालेले आहे. एसटी महामंडळाकडेही प्रवाशांची गर्दी असते. त्यामुळे प्रवाशांना खासगी ट्रॅव्हल्स हाच पर्याय शिल्लक असतो.

मात्र, याच संधीचा खासगी प्रवासी वाहतुक करणारे गैरफायदा उठवतात. शहरातून दररोज सुमारे पाचशेहून अधिक खासगी बस राज्याच्या विविध भागात जातात. या व्यतिरिक्त मुंबईहूनही मोठ्या संख्येने खासगी बस पुण्यातून पुढे मार्गस्थ होतात. ट्रॅव्हल्स चालकांकडून या काळात मोठ्या प्रमाणात तिकीट दर वाढवले जातात. काही ठिकाणी तिकीट दरामध्ये दुप्पट, तिप्पट वाढ केली जाते. ही वाढ प्रवाशांच्या खिशाला चांगलाच चाट लावत आहे. प्रवाशांची संख्या वाढण्याच्या काळात बसचे भाडे वाढविण्याचे प्रकार होतात. त्यामुळे प्रवाशांना मोठा भुर्दंड बसत आहे. त्यामुळे सुटीच्या काळात गावी जावे की नाही असा प्रश्न सर्वसामान्यांना भेडसावत आहे. उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत खासगी प्रवासी बसची वाहतूक पथकामार्फत तपासणी करावी. तिकिट बुकिंग काउंटरवरदेखील जाऊन तपासणी व्हावी. गैरप्रकार आढळल्यास संबंधितांवर कारवाई केली जावी. भाडेवाढीमुळे प्रवाशांना विनाकारण भुर्दंड सहन करावा लागत आहे. या त्रासापासून सुटका होऊन नागरिकांची होणारी लूटमार थांबवावी, अशी मागणी प्रवाशांमधून केली जात आहे.

### सरकारच्या कमाल दराकडे दुर्लक्ष

खासगी प्रवासी बसला एसटी बसच्या प्रतिकिलोमीटर भाडेदाच्या दीडपट भाडे आकारता येते. याबाबतचे कमाल भाडे सरकारने निश्चित केले आहे. हे दीडपट दर केवळ उन्हाळी सुट्टीच्या कालावधीत असतात. काही खासगी प्रवासी बस सणासुदीच्या व गर्दीच्या हंगामामध्ये प्रवाशांकडून मनमानी भाडे आकारतात. मात्र, जास्त भाडे आकारणाऱ्या खासगी बसवर आरटीओ आणि वाहतूक पोलिसांकडून कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे खासगी आराम बस चालकांच्या मनमानीत वाढ होत आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या बसमालकांवर आरटीओने कारवाई करणे गरजेचे आहे.

---

# बचत गटांच्या महिलांकडून मालमत्ता कर बिलांचे वाटप!

## मालमत्ताधारकांनी सहकार्य करावे : पिंपरी-चिंचवड पालिका प्रशासनाचे आवाहन

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने २०२५-२६ या आर्थिक वर्षातही महिला बचत गटाच्या मार्फत बिलांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. तरी बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.**





पिंपरी-चिंचवड शहरात ६ लाख १५ हजार ८६३ नोंदणीकृत मालमत्ता आहेत. त्यानुसार सर्वच बिलांची छपाई होऊन बिले वाटप करण्यास सुरुवात झाली आहे. महिला बचत गटातील महिलांच्या माध्यमातून मिळकतकर बिले घरोघरी पोहोचवण्याची जबाबदारी महानगरपालिकेने महिला आर्थिक विकास महामंडळावर सोपवली आहे. बिल वाटप करण्यात येणाऱ्या महिलांना महानगरपालिकेच्या वतीने ओळखपत्र ही देण्यात आले आहे. ३१ मे पर्यंत सर्व बिलांचे वितरण करण्याचे नियोजन महानगरपालिकेने केले आहे. तरी नागरिकांनीही बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. मालमत्ता कर भरण्याची ऑनलाइन सुविधा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आर्थिक वर्ष २०२५-२६ ची मालमत्ता कर बिले ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आली असून, करदात्यांना त्यांच्या नावावर नोंद असलेल्या मालमत्तांची बिले www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता व भरता येतील. तसेच मालमत्ता कर बिले ३० जूनपर्यंत ऑनलाईन पद्धतीने बिले भरल्यास सामान्य करावर १० टक्के सवलत मिळणार आहे.

> "बचत गटांच्या महिलांमार्फत मालमत्ता कर बिलांचे वाटप सुरू झाले आहे. यामुळे बचत गटांच्या महिलांच्या आर्थिक सक्षमतेस बळकटी मिळणार आहे. तसेच नागरिकांपर्यंत वेळेवर बिले पोहोचवण्याच्या उद्देशालाही चालना मिळणार आहे. नागरिकांनी देखील बिल वाटप करण्यासाठी येणाऱ्या महिलांना सहकार्य करावे.
>
> \- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> "पिंपरी चिंचवड महानगरपालिका मालमत्ता कर विभागाचे बिल वाटप महिला बचत गटांच्या महिलांमार्फत करण्यात येत आहे. ३० जून २०२५ पर्यंत कर भरल्यास मालमत्ताधारकांना विविध सवलतींचा लाभ घेता येणार आहे. तरी जास्तीत जास्त मालमत्ताधारकांनी लवकरात लवकर कर भरून सवलतींचा लाभ घ्यावा.
>
> \- प्रदीप जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त,
> पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

# 'ऑपरेशन सिंदूर' चं प्रत्यक्ष प्लॅनिंग, अभ्यास आणि लष्करी कारवाई !

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### वैराग्यावाचून सारा परमार्थ लटका

पक्ष्यांची पिले त्यांच्या पंखाखाली वाढतात, त्याप्रमाणे घरातल्या माणसांना आपण प्रेमाच्या आश्रयात ठेवावे. आपण त्यांच्यावर प्रेम करतो याची जाणीव ज्याला असेल, त्याचे दोष काढलेले त्याला बोचत नाहीत. आईने मुलाचे दोष त्याला सांगितले तरी त्याला त्याचे वाईट वाटत नाही. रोग्याच्या अंगातला ताप निघाला की त्याला शक्तीचे औषध लागू पडते; कारण शक्ती येणे हे स्वाभाविक आहे. त्याचप्रमाणे, अंत:करण शुद्ध झाले की परमार्थ सोपा बनतो. परमार्थात मनाचे कष्ट आहेत. कारण आपल्याला मनाच्या आजपर्यंतच्या सवयीच्या उलट जायचे आहे; आणि म्हणूनच परमार्थाला अगदी स्वत:पासून सुरुवात करायची असते. आतमध्ये भगवंताचे अनुसंधान ठेवून बाहेरून वृत्ती आवरण्याचा जो प्रयत्न करील, त्याला परमार्थाचा अनुभव फार लवकर येईल. आपण आपले मन भगवंताच्या अनुसंधानात मोठ्या काळजीपूर्वक ठेवले असताना त्याच्यावर आघात करायला विषय अगदी टपलेला असतो. मन जरा भगवंतापासून बाजूला झाले की पुरे, विषयाने त्याच्यावर घाला घातलाच म्हणून समजावे. साधकाने रात्रंदिवस अगदी डोळ्यात तेल घालून जपले पाहिजे. म्हणून परमार्थ म्हणजे अखंड सावधानता होय.

प्रपंच आणि परमार्थ वेगळा नाही. प्रपंच अनासक्तीने आणि आनंदाने करणे हाच परमार्थ. परमार्थाच्या आड काय येते ? धन, सुत, दारा वगैरे आड येत नाहीत, तर त्यांच्यावरचे जे ममत्व ते आड येते. वस्तूवर आसक्ती न ठेवणे हे वैराग्य आहे; ती वस्तूच नसणे हे वैराग्य नव्हे. एखाद्याला बायको नसली म्हणजे तो विरक्त आणि असली तर आसक्त, असे म्हणता येणार नाही. बायको असून लंपट नसेल तो विरक्त. आहे ते परमात्म्यानेच दिले आहे आणि ते त्याचे आहे, असे मानून आनंदाने राहणे हे वैराग्य होय. या भावनेत राहून जो इंद्रियांच्या नादी लागत नाही, तो वैरागी. वैराग्यावाचून सारा परमार्थ लटका आहे. कोणतीही गोष्ट अभ्यासानेच साध्य होत असते. आज खरी भक्ती नाही म्हणून भगवंताचे स्मरण नाही, आणि भगवंताचे स्मरण ठेवण्याचा अभ्यास केल्याशिवाय खरी भक्ती येत नाही. शहाण्या माणसाने उगीच विकल्प न लढविता, भगवंताचे स्मरण ठेवायला आरंभ करावा. ज्या ठिकाणी आपल्या ओळखीचे कुणी नाही, आपले आप्त कुणी नाहीत, जिथे आपल्याला कुणी मान देत नाही, अशा ठिकाणी राहून अनुसंधानाचा अभ्यास करावा. जिथे कुणी आपल्याला ओळखीचे नाही असे स्थान आपल्या अभ्यासाला फार चांगले असते.

बोधवचन:- बाह्यांगाने करावी प्रपंचाची संगति। चित्ति असावा एक रघुपति॥



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील

संस्थापक, संपादक

**काश्मीरमधील पहलगामला झालेल्या दहशतवादी हल्ल्यासंदर्भात संपूर्ण देश भावनिक झाला आणि २७ निष्पाप नागरिकांचे बळी घेणाऱ्या पाकिस्तानला तसेच दहशतवाद्यांना कायमचा धडा शिकवण्याची भाषा प्रत्येक भारतीय करू लागला!**

### पाकड्यांना ठेचण्याची भाषा..

केवळ दहशतवाद्यांनाच नव्हे तर त्यांना पाठिंबा देणाऱ्या पाकड्यांनाही कायमचंच ठेचून काढा, अशी भावना प्रत्येक भारतीयाने बोलून दाखवली. उठसूठ भारतामध्ये हिंसाचार घडवायचा, आम्ही इशारे द्यायचे, ही युद्धनीती आता बास झाली, असे म्हणण्यापर्यंत काहींची मजल गेली ! हे सर्व घडत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी हे पाकिस्तानच्या घरात घुसून त्यांना धडा शिकवण्याचे नियोजन करीत होते, त्यामुळे तमाम भारतीयांची मानसिकता अतिउच्च थराला जाऊन बसली होती, हे आधी लक्षात घेऊ या !

### जनरल अनिल चव्हाण यांचा 'आँखो देखा हाल' ?

भारताच्या या कारवाईबाबत पुणे विद्यापीठात एक व्याख्यान आयोजित केले होते आणि प्रत्यक्षात कारवाई करणाऱ्या जनरल अनिल चौहान यांनी 'आँखो देखा हाल' मांडला. जनरल चौहान यांनी अत्यंत शांतपणे व्याख्यानाच्या विषयाचे अत्यंत मुद्देसूद विवेचन उपस्थित श्रोत्यांसमोर केले. त्यांच्या बोलण्यात कोठेही अनावश्यक अभिनिवेश नव्हता, पण त्यांच्या बोलण्यातून 'आधी केले मग सांगितले' ही भूमिका अधोरेखित झाली. पहलगाम हल्ल्यानंतर भारतातील ज्येष्ठ राज्यकर्ते आणि लष्कर यांनी सर्व शक्यता अभ्यासल्या. कोणतीही लष्करी कारवाई करण्यापूर्वी अनेक गोष्टींचा अत्यंत बारकाईने अभ्यास करावा लागतो. यात शत्रूची क्षमता, मानसिकता, त्यांच्या महत्त्वाच्या ठिकाणांची माहिती, त्या ठिकाणच्या सॅटेलाईट इमेजेस, त्यांना उपलब्ध असलेल्या संरक्षण सामग्रीची परिणामकारकता,

आघात करण्यासाठी आपल्याकडे असलेले वेगवेगळे पर्याय, प्रत्यक्ष कारवाई जिथे करायची त्या ठिकाणांचे अचूक स्थान, कारवाईस लागणारा वेळ, आघाताचे लक्ष्यावर होणारे परिणाम, अशा कारवाई नंतर स्वाभाविकपणे शत्रू करू शकेल अशा प्रतिकाराचे स्वरूप आणि व्याप्ती, ते हल्ले परतवून लावण्याची आपली क्षमता, या युद्धजन्य परिस्थितीचा कालावधी, त्यासाठी लागणारी साधने, होणारा खर्च, संरक्षण सामग्री आणि मनुष्यहानी सारख्या संभाव्य



नुकसानीचा अंदाज, ते नुकसान अत्यल्प असावे, यासाठी घ्यावी लागणारी काळजी, अशी लष्करी कारवाईची संपूर्ण प्रक्रिया त्यांनी सामान्य मनुष्याला समजेल इतकी सोपी करून सांगितली.

### प्रत्यक्ष युद्धात उतरण्यापूर्वी..

पुढे ते म्हणाले, की मनुष्य पाच संवेदना अनुभवतो. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध. पण, युद्धतंत्रात या पलीकडे असलेल्या भूमीची कंपने, चुंबकीय लहरी, विद्युत् चुंबकीय लहरी, आण्विक ऊर्जेच्या प्रसारणाची तीव्रता, वातावरणातील बदल, अनेक प्रकारच्या उपग्रह प्रतिमांचे विश्लेषण हे सारे करावे लागते.

शत्रूच्या प्रदेशातील मीडिया आणि सोशल मीडियातून उपलब्ध होणाऱ्या प्रचंड माहितीचे अचूक विश्लेषण, अशा अनेक क्षमतांचा एकत्रित उपयोग करून प्रत्यक्ष कारवाई करणाऱ्या तीनही लष्करी दलांना एकाचवेळी ही माहिती नेमकेपणाने पुरवणे आणि त्यांच्या संयुक्त कारवाईत उत्कृष्ट समन्वय ठेवणे, हे साधले की आपले कमीतकमी नुकसान होते आणि शत्रू प्रदेशात खूप मोठा विध्वंस घडवता येतो.

### भारताने काय काय काळजी घेतली ?

भारताने ही सर्व काळजी घेऊन त्या रात्री १.०५ मिनिटांनी सुरू केलेली पहिली लष्करी कारवाई १.३० वाजता संपवली. यानंतर आंतरराष्ट्रीय राजशिष्टाचाराचा भाग म्हणून भारताच्या 'डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स' यांनी पाकिस्तानी समपदस्थाला असे हल्ले केल्याची औपचारिक माहिती दिली आणि असेही बजावले, की भारताने फक्त दहशतवाद्यांचेअड्डे नष्ट केले आहेत. एकाही लष्करी किंवा नागरी वसाहतीला याची झळ पोहोचली नाही, पाकिस्तानने यावर काही लष्करी साहस करून भारतावर हल्ले केले, तर त्याचे भारत अकल्पनीय उत्तर देईल, असेही भारताने ठणकावले.

### पाकिस्तानचे हल्ले निष्प्रभ..

यानंतर पाकिस्तानने शेकडो हल्ले केले, जे भारतीय हवाई संरक्षण यंत्रणेने निष्प्रभ केले. याचे उत्तर म्हणून नंतर भारताने पाकिस्तानचे विमानतळ नष्ट करणारे जे भयंकर आणि भयावह हल्ले अत्यंत अचूकतेने केले, त्यात पाकिस्तानची जी हानी झाली, त्याचा तात्काळ परिणाम म्हणून त्यांच्या 'डायरेक्टर जनरल ऑफ मिलिटरी ऑपरेशन्स' ने लगेच फोन करीत आपल्या समपदस्थांना युद्धविरामाची विनंती केली, असेही जनरल चौहान यांनी नमूद केले.

### युद्धविरामाची दोन कारणे..

पुढे जनरल अनिल चौहान म्हणाले, की या विनंतीची दोन कारणे दिसतात. पहिले हे, की युद्ध आणखी काही काळ सुरू ठेवले, तर अपरिमित हानी होईल, हा अंदाज त्यांना आला असावा आणि दुसरे हे, की त्यांनी केलेल्या असंख्य हल्ल्यांनी भारताचे खरोखरच काही नुकसान झाले, की नाही, हे त्यांना समजण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान त्यांच्याकडे नाही. भारताने अगोदरच पाकिस्तानला आपली भूमिका स्पष्ट शब्दात कळवली होती, त्याप्रमाणे, भारताचा उद्देश पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांची सर्व केंद्रे दहशतवाद्यांसह नष्ट करणे, हाच होता आणि भविष्यातही राहील. यापुढे पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी किंवा पाकिस्तानी लष्कराने काही कुरापत काढली, तर आम्ही पाकिस्तानच्या भूमीवर कुठेही भयंकर हल्ले करू शकतो, हे त्यांना दाखवून दिले होते. जनरल चौहान यांच्या या अवघ्या अर्ध्या तासाच्या व्याख्यानाने श्रोत्यांच्या मनातील सर्व संदेह धुके विरावे, तसे नाहीसे झाले होते.

### 'ऑपरेशन सिंदूर' संपलेले नाही..

आपल्या छोट्याशा व्याख्यानात त्यांनी 'ऑपरेशन सिंदूर' अजून संपलेले नाही, हे सांगताना आपले संपूर्ण लष्कर, आपल्या सर्व यंत्रणा चोवीस तास 'हाय अॅलर्ट मोड'वर असून कोठेही यत्किंचितही गाफिल नाहीत याची नि:संदिग्ध ग्वाही दिली. कोणताही देश लष्करी सामर्थ्य यासाठीच निर्माण करतो, ज्यामुळे आपल्या सीमांचे आणि आपल्या नागरिकांचे शत्रूपासून रक्षण करता यावे. यालाच आपल्या देशाचे सार्वभौमत्व अबाधित ठेवणे म्हणतात. एक सामर्थ्यशाली राष्ट्रच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक दृष्ट्या प्रगतिशील राष्ट्र यामुळेच बनते.

### युद्धच पण विविध आघाड्यांवर..

जनरल चौहान या व्याख्यानात असेही म्हणाले, की बदलत्या काळात युद्ध फक्त रणांगणावरच होत नाही, तर ते सायबर वॉर, मीडिया वॉर, सोशल मीडिया वॉर, इन्फर्मेशन अॅनालिसिस वॉर, इकॉनॉमिक वॉर, सायकॉलॉजीकल वॉर अशा अनेक पातळ्यांवर लढले जाते. समाज, राज्यकर्ते आणि लष्कर या तिन्हींचे मनोबल नेहमीच सर्वोत्तम राहील, यासाठी प्रत्येकाने शक्य ते सारे प्रयत्न आपले पवित्र राष्ट्रीय कर्तव्य म्हणून करावे, हा सारांश मनात घेऊन निर्भयतेने, संदेहरहित होऊन श्रोत्यांचे समाधान झाले.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# ठाकरे गटाला पुन्हा भगदाड पडणार!

## श्रीरामपूरचे माजी आमदार यांचा शिंदे गटात प्रवेश



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या शिंदे गटाने ठाकरे गटाला पुन्हा भागदाड पाडण्याची तयारी केली आहे. त्यासाठी शनिवारी पक्षाचे संपर्कमंत्री शंभूराजे देसाई यांच्या उपस्थितीत नगर शहरात मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात नगर शहरातील काही माजी नगरसेवक तसेच श्रीगोंदा व पाथर्डीतील पंचायत समितीचे माजी सदस्य पक्षप्रवेश करणार आहेत.**

शिंदे गटाचे शहरप्रमुख सचिन जाधव व जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी ही माहिती दिली. यावेळी पक्षाचे पदाधिकारी बाबुशेठ टायरवाले, संभाजी कदम, संजय शेंडगे, राम नळकांडे, बाळासाहेब बोराटे तसेच माजी नगरसेवक उपस्थित होते. शनिवारी दुपारी २ वा. माउली सभागृहात मेळावा होणार आहे. मंत्री शंभूराजे देसाई निवडणुकीची रणनीती यावेळी स्पष्ट करतील. यावेळी अनिल शिंदे व सचिन जाधव यांनी सांगितले की, शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांसाठी इच्छुकांची मोठी गर्दी होणार आहे. याद्दष्टीने निवडणुकीची तयारी सुरू आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व संपर्कमंत्र्यांची बैठक घेऊन निवडणुकीबाबत सूचना दिल्या आहेत. मेळाव्याच्या माध्यमातून पदाधिकाऱ्यांपर्यंत त्या पोहोचवल्या जातील.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर की महायुतीच्या माध्यमातून लढवायच्या याबाबत पक्ष जो आदेश देईल त्याप्रमाणे निर्णय घेतला जाईल.

सध्या तरी निवडणुका महायुतीच्या माध्यमातून लढवणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र ऐनवेळी स्वबळाचा नारा झाला तर त्याद्दष्टीने प्रयत्न सुरू आहेत. मात्र महायुतीमधील संकेतानुसार मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा एकमेकांच्या पक्षात प्रवेश होणार नाही, असे सचिन जाधव यांनी सांगितले.श्रीरामपूरचे माजी आमदार व अशोक सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष भानुदास मुरकुटे, श्रीरामपूरचे माजी नगरसेवक संजय छल्लारे शनिवारी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश करणार आहेत. मुरकुटे यापूर्वीही एकत्रित शिवसैनिक होते व त्यांनी कोपरगाव लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये व नंतर तेलंगणातील 'बीआरएस' पक्षात प्रवेश केला होता. श्रीरामपूरमध्ये ते लोकसेवा मंडळाच्या माध्यमातून अस्तित्व ठेवून आहेत.शिंदे गटाचे शहरप्रमुख सचिन जाधव व जिल्हाप्रमुख अनिल शिंदे यांनी ही माहिती दिली. यावेळी पक्षाचे पदाधिकारी बाबुशेठ टायरवाले, संभाजी कदम, संजय शेंडगे, राम नळकांडे, बाळासाहेब बोराटे तसेच माजी नगरसेवक उपस्थित होते. शनिवारी दुपारी २ वा. माउली सभागृहात मेळावा होणार आहे. मंत्री शंभूराजे देसाई निवडणुकीची रणनीती यावेळी स्पष्ट करतील. यावेळी अनिल शिंदे व सचिन जाधव यांनी सांगितले की, शिवसेनेत प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांसाठी इच्छुकांची मोठी गर्दी होणार आहे. याद्दष्टीने निवडणुकीची तयारी सुरू आहे.

### शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्व संपर्कमंत्र्यांची बैठक घेऊन निवडणुकीबाबत सूचना दिल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर की महायुतीच्या माध्यमातून लढवायच्या याबाबत पक्ष जो आदेश देईल त्याप्रमाणे निर्णय घेतला जाईल. सध्या तरी निवडणुका महायुतीच्या माध्यमातून लढवणार असल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र ऐनवेळी स्वबळाचा नारा झाला तर त्याद्दष्टीने प्रयत्न सुरू आहेत. मात्र महायुतीमधील संकेतानुसार मित्र पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा एकमेकांच्या पक्षात प्रवेश होणार नाही, असे सचिन जाधव यांनी सांगितले.श्रीरामपूरचे माजी आमदार व अशोक सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष भानुदास मुरकुटे, श्रीरामपूरचे माजी नगरसेवक संजय छल्लारे शनिवारी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश करणार आहेत.

# शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी प्रशासनाची तयारी

## रायगडावर 1 लाख पाण्याच्या बाटल्या, 15 खाटांचे रुग्णालय



। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**किल्ले रायगडावर ६ जून रोजी तारखेनुसार शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून दिड लाख शिवभक्त गडावर दाखल होण्याचा शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन रायगड जिल्हा प्रशासनाने शिवभक्तांच्या जेवणासाठी पाच हजार किलो तांदुळ आणि १ लाख पाण्याचा बाटल्या उपलब्ध करून दिला आहे. गडावर १५ बेडचे रुग्णालय तर पाचाड येथे पाच बेडचा अतिदक्षता विभाग कार्यान्वित करण्यात आला आहे.**

दरवर्षी रायगड किल्ल्यावर तारिख आणि तिथी नुसार शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो. यावर्षी तारखेनुसार ६ जून रोजी तर तिथी नूसार ९ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने राज्यभरातील लाखो शिवभक्त रायगड किल्ल्यावर दाखल होणार आहे. संभाजी राजे छत्रपती यांच्या उपस्थितीत होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी एक लाख शिवभक्त गडावर दाखल होण्याची शक्यता आहे. तर ९ जून रोजी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्याला ५० हजार शिवभक्त हजेरी लावणे अपेक्षित आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने जोरदार तयारी केली आहे. रायगड किल्ला आणि पाचाड परिसरात पावणे दोन हजार पोलीस तैनात करण्यात आले आहेत. राज्य राखीव दल आणि दंगल नियंत्रण पथकांना पाचारण करण्यात आले आहे. गडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी पाचाड येथे दिडशे तर गडावर दिडशे पोर्टेबल स्वच्छतागृह बसविण्यात आले आहेत. पायरी मार्गावर ५०० लीटरच्या ५० पाण्याच्या टाक्या बसविण्यात आल्या आहेतयाशिवाय १ लाख लीटर पाण्यांच्या बाटल्या प्रशासनाकडून उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ५ हजार किलो तांदुळ आणि अन्न शिजवण्यासाठी लागणारी इतर सामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### शासनाकडून 7 स्क्रीन लावल्या

६ जूनला दिड लाख लोकांच्या जेवणाची व्यवस्था तर ९ जूनसाठी ५० हजार लोकांच्या जेवणाची व्यवस्था ही प्रशासनाकडून केली जाणार आहे. गडावर १५ बेडचे रुग्णालय, गडावर चार तात्पुरते दवाखाने, पायरी मार्गावर १५ तात्पुरते दवाखाने, महाड आणि माणगाव येथे बेड आरक्षित ठेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आपत्ती व्यवस्थापनासाठी पथके तैनात ठेवण्यात आली आहेत. १२ वाहन तळांची उभारणी केली आहे. पाचाड येथील वाहनतळापासून पायरी मार्गापर्यंत प्रवाश्यांची ने आण करण्यासाठी १०० एसटीच्या बसेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. गर्दी व्यवस्थापनासाठी १७ ठिकाणी उद्घोषणा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.गडावरील शिवराज्याभिषेक सोहळा पाचाड येथील नागरिकांना पाहता यावा यासाठी शासनाकडून ७ स्क्रीन लावण्यात आल्या आहेत.

# लोक मरत असताना उत्सव सुरू होता

## बंगळुरूतील चेंगराचेंगरीवरून भाजपाची टीका

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**बंगळुरूमध्ये चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बँगळुरू संघाच्या विजयी यात्रेवेळी (व्हिक्ट्री परेड) झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा बळी गेला आहे. या दुर्घटनेवरून कर्नाटकमधील राजकारण तापलं आहे. या घटनेवरून विरोधी पक्ष सत्ताधाऱ्यांना धारेवर धरत आहेत. भाजपाने या दुर्घटनेबद्दल 'सरकारचं मोठं अपयश' व 'राजकीय लालसा' असा उल्लेख केला आहे. भाजपाने म्हटलं आहे की "ही केवळ चेंगराचेंगरी नव्हती, तर मुख्यमंत्री सिद्धरामय्या व उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांच्यातील अंतर्गत कलहामुळे निर्माण झालेली सरकारनिर्मित दुर्घटना होती".**



भाजपाचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींवरही टीका केली आहे. ते म्हणाले, "राहुल गांधी दररोज भारतीय लष्कर व पंतप्रधान नरेंद्र मोदींची थट्टा उडवत आहेत. मात्र, आता त्यांचं सरकार असलेल्या राज्यात एक दुर्घटना होऊन त्यात अनेक लोक ठार झालेले असताना त्यांनी यावर चकार शब्द काढलेला नाही. आता राहुल गांधी कुठे आहेत? राहुल गांधी यांनी या घटनेची दखल घेत कारवाई करावी. त्यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या व उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचा राजीनामा घ्यावा".संबित पात्रा म्हणाले, "या संपूर्ण दुर्घटनेची नैतिक जबाबदारी घेऊन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यायला हवा. तसेच डी. के. शिवकुमार यांनी जनतेची माफी मागावी. मुळात त्या ठिकाणी ३ लाख लोक कसे काय दाखल झाले?

याप्रश्नाचं उत्तर द्यावं. इतक्या लोकांना तिथे जाण्याची परवानगी कोणी दिली? याची उत्तरं जनतेला मिळायला हवीत. पोलिसांनी परवानगी दिली नव्हती तरी देखील ही विजयी यात्रा कशी व कोणी काढली?"भाजपा प्रवक्ते संबित पात्रा म्हणाले, "चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर लोक मरत होते आणि आतमध्ये विजयी जल्लोष केला जात होता. अजूनही ५० जण रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यापैकी काहीजण गंभीर जखमी आहेत. ही कर्नाटक सरकारसाठी शरमेची बाब आहे. अशाच एका चेंगराचेंगरी प्रकरणामुळे टॉलिवूड अभिनेता अल्लू अर्जुनला अटक करण्यात आली होती. मग या प्रकरणात डी. के. शिवकुमार व सिद्धरामय्या यांच्यावर कारवाई का केली नाही?"भाजपाचे प्रवक्ते संबित पात्रा यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींवरही टीका केली आहे. ते म्हणाले, "राहुल गांधी दररोज भारतीय लष्कर व पंतप्रधान नरेंद्र मोदींची थट्टा उडवत आहेत. मात्र, आता त्यांचं सरकार असलेल्या राज्यात एक दुर्घटना होऊन त्यात अनेक लोक ठार झालेले असताना त्यांनी यावर चकार शब्द काढलेला नाही. आता राहुल गांधी कुठे आहेत? राहुल गांधी यांनी या घटनेची दखल घेत कारवाई करावी. त्यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या व उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांचा राजीनामा घ्यावा".संबित पात्रा म्हणाले, "या संपूर्ण दुर्घटनेची नैतिक जबाबदारी घेऊन मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यायला हवा. तसेच डी. के. शिवकुमार यांनी जनतेची माफी मागावी. मुळात त्या ठिकाणी ३ लाख लोक कसे काय दाखल झाले? याप्रश्नाचं उत्तर द्यावं. इतक्या लोकांना तिथे जाण्याची परवानगी कोणी दिली?

### कर्नाटकमधील राजकारण तापलं

पोलिसांनी परवानगी दिली नव्हती तरी देखील ही विजयी यात्रा कशी व कोणी काढली?"भाजपा प्रवक्ते संबित पात्रा म्हणाले, "चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर लोक मरत होते आणि आतमध्ये विजयी जल्लोष केला जात होता.अशाच एका चेंगराचेंगरी प्रकरणामुळे टॉलिवूड अभिनेता अल्लू अर्जुनला अटक करण्यात आली होती. मग या प्रकरणात डी. के. शिवकुमार व सिद्धरामय्या यांच्यावर कारवाई का केली नाही?"बंगळुरूमध्ये चिन्नास्वामी स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बँगळुरू संघाच्या विजयी यात्रेवेळी (व्हिक्ट्री परेड) झालेल्या चेंगराचेंगरीत ११ जणांचा बळी गेला आहे. या दुर्घटनेवरून कर्नाटकमधील राजकारण तापलं आहे.

# इन्फ्लुएन्सर शर्मिष्ठा पनोलीला दिलासा!

## सोशल मीडिया पोस्ट प्रकरणात अंतरिम जामीन मंजूर

। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**कोलकत्ता उच्च न्यायालयाने २२ वर्षीय सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर शर्मिष्ठा पनोलीला अंतरिम जामीन मंजूर केला आहे. काही दिवसांपूर्वी एका सोशल मीडिया पोस्टमधून धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपाखाली शर्मिष्ठानला अटक करण्यात आली होती.**



शर्मिष्ठा पनोली ही पुण्यातील सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिवर्सिटीची विद्यार्थी आहे. तिची सोशल मीडियावर मोठी फॉलविंग आहे. तिचे एक्सवर जवळपास ८५,००० फॉलोअर्स आहेत आणि इंस्टाग्रामवर ९०,००० इतके जण तिला फॉलो करतात. गेल्या शुक्रवारी दुपारी गुडगाव येथील तिच्या राहत्या घरातून तिला अटक करण्यात आली होती. एआयएमआयएमचे राष्ट्रीय प्रवक्ते वारिस पठाण यांनी शर्मिष्ठाने पोस्ट केलेला एक व्हिडिओ शेअर केला होता. ज्यामध्ये त्यांनी इस्लाम धर्माचा अपमान केल्याचा आणि जातीय तेढ पसरवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला होता. त्यांच्या पोस्टमध्ये पठाण यांनी गृहमंत्र्यांना टॅग केले आणि शर्मिष्ठाला अटक करण्याची मागणी केली होती. दरम्यान सोशल मीडिया पोस्टनंतर वादाला तोंड फुटले होते. यानंतर तिच्यावर सर्व स्तरातून जोरदार टीका करण्यात आली. अखेर शर्मिष्ठा पनोलीने सोशल मीडियावर बिनशर्त माफी मागितली होती. याचबरोबर इन्स्टाग्रामवरील तिचे व्हिडिओ आणि पोस्टही हटवल्या होत्या.एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये शर्मिष्ठा म्हणाली होती की, "या प्रकरणी मी बिनशर्त माफी मागते. मी जे काही मांडले त्या माझ्या वैयक्तिक भावना आहेत. मी कधीही कोणालाही जाणून बुजून दुखावू इच्छित नव्हते,मला सर्वांकडून सहकार्याची अपेक्षा आहे. यापुढे, मी सार्वजनिक पोस्ट करताना सावध राहीन. पुन्हा एकदा, कृपया माझी माफी स्वीकारा.तिच्या विरोधात १४ मे रोजी वाजहत खान यांच्याकडून गार्डनर रिच पोलीस ठाण्यात या प्रकरणात एफआय आर दाखल करण्यात आला होता.शर्मिष्ठा पनोली ही पुण्यातील सिम्बॉयसिस इंटरनॅशनल युनिवर्सिटीची विद्यार्थी आहे.

### एक्सवर 85,000 फॉलोअर्स

तिची सोशल मीडियावर मोठी फॉलविंग आहे. तिचे एक्सवर जवळपास ८५,००० फॉलोअर्स आहेत आणि इंस्टाग्रामवर ९०,००० इतके जण तिला फॉलो करतात. गेल्या शुक्रवारी दुपारी गुडगाव येथील तिच्या राहत्या घरातून तिला अटक करण्यात आली होती. एआयएमआयएमचे राष्ट्रीय प्रवक्ते वारिस पठाण यांनी शर्मिष्ठाने पोस्ट केलेला एक व्हिडिओ शेअर केला होता. ज्यामध्ये त्यांनी इस्लाम धर्माचा अपमान केल्याचा आणि जातीय तेढ पसरवण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला होता. त्यांच्या पोस्टमध्ये पठाण यांनी गृहमंत्र्यांना टॅग केले आणि शर्मिष्ठाला अटक करण्याची मागणी केली होती.दरम्यान सोशल मीडिया पोस्टनंतर वादाला तोंड फुटले होते. यानंतर तिच्यावर सर्व स्तरातून जोरदार टीका करण्यात आली.

# तुमचे 70 रुपये वारले!

मराठी मनोरंजन विश्वात 'अशी ही बनवा बनवी' या सिनेमाचं नाव सुवर्ण अक्षरात कोरलं गेलं आहे. या चित्रपटातील सगळेच डायलॉग चाहत्यांना तोंडपाठ आहेत. हा सिनेमा प्रदर्शित होऊन आता जवळपास ३७ वर्षे उलटून गेली आहेत. तरीही, 'धनंजय माने इथेच राहतात का', 'आणि हा माझा बायको पार्वती', 'तुमचे ७० रुपये वारले' असे सगळे संवाद सोशल मीडियावर वारंवार चर्चेत येतात, यावरुन असंख्य मीम्स देखील तयार केले जातात. अलीकडेच 'अशी ही बनवा बनवी' सिनेमातील 'तुमचे ७० रुपये वारले' या लोकप्रिय डायलॉगवर प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीच्या लेकीने एक नवीन प्रयोग करुन पाहिला आहे. या अभिनेत्रीचं नाव आहे समिधा गुरु. आजवर अनेक लोकप्रिय मालिकांमध्ये समिधाने आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे.समिधा गुरुने तिची लेक दुर्वा विविध ACCENTS मध्ये 'तुमचे ७० रुपये वारले' हा डायलॉग म्हणून दाखवत असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. दुर्वाचं हे अनोखं कौशल्य, तिची बोलण्याची शैली पाहून सर्वांनीच तिचं कौतुक केलं आहे.समिधा गुरु लेकीला म्हणते, "दुर्वा तुला 'अशी ही बनवा बनवी'मधला तो 'तुमचे ७० रुपये वारले' तो डायलॉग माहितीये ना?" यावर दुर्वा "हो माहितीये" असं सांगते. पुढे, समिधा लेकीला हा आयकॉनिक डायलॉग ब्रिटीश, अमेरिकन, LAID BACK ACCENT, ऑस्ट्रेलियन, इटालियन आणि शेवटी विदर्भातील ACCENT मध्ये म्हणून दाखवायला सांगते. समिधा गुरुने या व्हिडीओला, "तुमचे 70 रुपये वारले... दुर्वाचा ACCENT GAME, खरंतर ३७ वर्षांपूर्वी ७० रुपये वारले पण आज तिसऱ्या पिढीपर्यंतसुद्धा ते जिवंतच आहेत. 'अशी ही बनवाबनवी' आणि त्यामधले डायलॉग हे पिढी दर पिढी असेच जिवंत राहणार आहेत त्यासाठी तुम्हा सगळ्यांचे आभार...

# जान्हवीचा जाऊबाईसह जबरदस्त डान्स!

'बिग बॉस मराठी'च्या पाचव्या सीझनमुळे अभिनेत्री जान्हवी किल्लेकर घराघरांत लोकप्रिय झाली. या शोच्या सुरुवातीला जान्हवीचा खेळ प्रेक्षकांना जराही आवडला नव्हता. मात्र, त्यानंतर निक्कीची टीम सोडल्यावर तिच्या 'बिग बॉस जर्नी'ला खऱ्या अर्थाने कलाटणी मिळाली. प्रत्येक टास्क जान्हवी जिद्दीने खेळायची आणि हळुहळू तिला प्रेक्षकांची पसंती देखील मिळाली. याशिवाय शोमध्ये असताना जान्हवीने सूरज चव्हाणबरोबर केलेला "कोंबडी पळाली..." हा डान्स सर्वत्र व्हायरल झाला होता. यामुळे जान्हवी उत्तम अभिनेत्री आहेच पण, ती खूप सुंदर डान्स देखील करते हे प्रेक्षकांना पाहायला मिळालं.काही दिवसांपूर्वीच जान्हवी आपल्या कुटुंबीयांसह गोवा फिरायला गेली होती. बाहेर फिरायला गेल्यावर अभिनेत्री, तिचे पती, मुलगा, जाऊबाई-दीर असे सगळेजण एकत्र धमाल करत असल्याचं पाहायला मिळालं होतं. याचे व्हिडीओ जान्हवीने सोशल मीडियावर शेअर देखील केले आहेत. मात्र, या सगळ्यात जान्हवीने नुकताच शेअर केलेला एक डान्स व्हिडीओ सध्या सर्वत्र चर्चेत आला आहे. जान्हवी किल्लेकर या व्हिडीओमध्ये तिच्या दोन्ही जाऊबाईंसह जबरदस्त डान्स करत असल्याचं यामध्ये पाहायला मिळत आहे. सध्या इन्स्टाग्राम रील्सवर "नटीनं मारली मिठी" हे गाणं तुफान व्हायरल होत आहे. अनेक मराठी सेलिब्रिटींनी यावर रील्स व्हिडीओ बनवले आहेत. आता या गाण्याची भुरळ जान्हवी किल्लेकरला सुद्धा पडली आहे.

# सई लोकूरला कन्यारत्न

मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री सई लोकूर आई झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासुन सईचे प्रेग्नंसी फोटोशूट चर्चेत होते. आता नुकतंच सईने सोशल मीडियावर आई झाल्याची गुड न्यूज सर्वांसोबत शेअर केलीय. सईला कन्यारत्न प्राप्त झाले असून आज १७ फेब्रुवारीला सईने मुलीला जन्म दिलाय. बाळ सुदृढ, सुंदर असुन ती जन्माला येताच अनेकांचं तिला प्रेम मिळालंय. या काळात तुम्ही आमच्यावर जो प्रेमाचा वर्षाव केला आणि पाठिंबा दिला, त्याबद्दल मी ऋणी आहे. आम्ही खुप आनंदात आहे. आई - बाबा झालेले सई - तीर्थदीप. सई लोकूरच्या सोशल मीडिया टीमने पोस्ट केलीय की, "एका छोट्या चेहऱ्यावर देवाचा आशिर्वाद. आमच्या बाळाच्या आगमनाची घोषणा करताना आम्हाला खूप आनंद होत आहे. आई आणि बाळ दोघेही ठीक आहेत. सर्व प्रेम आणि शुभेच्छांसाठी धन्यवाद." अशी पोस्ट सईच्या सोशल मीडिया टीमने शेअर केलीय. सईला कन्यारत्न प्राप्त झाल्याबद्दल अनेक कलाकारांनी आणि तिच्या चाहत्यांनी कमेंटमध्ये तिचं अभिनंदन केलंय. दरम्यान सईला मुलगी झाल्याने तिचा काही दिवसांपुर्वीचा व्हिडीओ चर्चेत आलाय. सई लोकुरने सोशल मीडियावर डोहाळेजेवणाचा व्हिडीओ शेअर केला होता. त्यावेळी सईच्या समोर दोन वाट्या ठेवल्या होत्या.



# दीपिकाचा एक्स बॉयफ्रेंड कोण?

अभिनेत्री दीपिका पादुकोणच्या एक्स बॉयफ्रेंडची सध्या खूप चर्चा होत आहे. मुझम्मिल इब्राहिम असं त्याचं नाव असून तो मॉडेल व अभिनेता आहे. दीपिका पादुकोणबरोबर दोन वर्षे रिलेशनशिपमध्ये राहिल्याचा दावा त्याने केला आहे. तसेच त्यावेळी दीपिका संघर्ष करत असताना मी स्टार होतो आणि मीच दीपिकाबरोबर ब्रेकअप केलं होतं, असंही मुझम्मिलने म्हटलं आहे. तर दीपिकाचा हा एक्स बॉयफ्रेंड नेमका कोण आहे? काय करतो? ते जाणून घेऊयात.मुझम्मिल इब्राहिमचा जन्म श्रीनगर, काश्मीर येथे २५ ऑगस्ट १९८६ रोजी झाला. तो मॉडेलिंग करून नंतर अभिनेता झाला. तो २००३ मध्ये 'ग्लॅडरग्स मॅनहंट इंडिया' ही स्पर्धा जिंकून 'मिस्टर इंडिया' ठरला होता. तेव्हा तो दिल्लीत जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठात मॅकेनिकल इंजिनिअरींग शिकत होता. मुझम्मिल इब्राहिमच्या कुटुंबाने दहशतवादामुळे २००४ साली काश्मिर सोडलं आणि मुंबईला स्थायिक झाले. इथे त्याने मॉडेलिंगमध्ये करिअर सुरू केलं. याच दरम्यान त्याची दीपिका पादुकोणशी भेट झाली आणि त्यांनी दोन वर्ष एकमेकांना डेट केलं.मुझम्मिल इब्राहिम आठ वर्षांचा असताना त्याला राष्ट्रपतींकडून 'जीवन रक्षा पदक' शौर्य पुरस्कार १९९४ मिळाला होता. त्याने स्विमिंग पूलमध्ये बुडणाऱ्या एका मुलाला वाचवलं होतं. इतकंच नाही तर १९ वर्षांनंतर त्याने गोव्यात समुद्रात बुडणाऱ्या ६० वर्षीय महिलेचे प्राणही वाचवले होते, त्यासाठी त्याला २००९ मध्ये 'गॉडफ्रे फिलिप्स नॅशनल ब्रेव्हरी अवॉर्ड' देण्यात आला होता.मुझम्मिल इब्राहिम हा दोन वेळा नॅशनल लेव्हल स्विमिंग चॅम्पियन राहिला आहे. तसेच त्याने मॉडेलिंगमध्येही अनेक अवॉर्ड्स जिंकले आहेत. त्याला GQ ने बेस्ट मेल मॉडल निवडलं होतं, तसेच त्याने एकदा टाइम्स टॉप मॉडेलचा किताब देखील जिंकला आहे.मुझम्मिल इब्राहिमने पूजा भट्ट दिग्दर्शित 'धोखा' चित्रपटातून २००७ मध्ये बॉलीवूड पदार्पण केलं होतं. या चित्रपटात तो मुख्य भूमिकेत होता.

# पूजा सावंत लवकरच लग्नबंधनात अडकणार

मराठीमोळी 'कलरफुल' अभिनेत्री पूजा सावंत लवकरच लग्नबंधनात अडकणार आहे. पूजा कधी आणि कोणासोबत लग्न करणार याची चाहत्यांना उत्सुकता होती. अखेर काही दिवसांपूर्वी तिने जोडीदारासोबतचा फोटो शेअर करत चाहत्यांना आनंदाची बातमी दिली. एबीपी माझाला दिलेल्या मुलाखतीत पूजाने उखाणे घेण्यास सज्ज असल्याचं सांगितलं आहे. पूजा सावंत ही मराठी मनोरंजनसृष्टीतील आघाडीची अभिनेत्री असून सिद्धेश चव्हणसोबत लवकरच ती विवाहबंधनात अडकणार आहे. आयुष्यातल्या 'मुसाफिर'बद्दल एबीपी माझाशी बोलताना पूजा सावंत म्हणाली,"माझ्या रिअल लाईफ हिरोचं नाव सिद्धेश चव्हाण आहे. आता आयुष्याचा नवा अध्याय सुरू होणार आहे. सिद्धेश आणि माझं अरेंज मॅरेज आहे. एकमेकांना पहिल्यांदा भेटल्यापासून लग्न ठरवण्यापर्यंत आम्ही खूप वेळ घेतला. त्यामुळे ते अरेंज कम लव्ह मॅरेज असेल". लग्नाच्या मुहूर्ताबद्दल बोलताना पूजा सावंत म्हणाली,"चव्हाण आणि सावंत हे दोन्ही कुटुंबिय मिळून लग्नाबाबत निर्णय घेतील. सध्या दोन्ही कुटुबियांमध्ये लग्नाबाबत बोलणी सुरू आहे. सिद्धेशला त्याच्या कामातून आणि मला माझ्या प्रोजेक्टमधून वेळ मिळेल त्यावेळी लगेचच आम्ही लग्न करू. उखाणे घेण्यास आता मी सज्ज आहे". पूजा सावंत म्हणते,"आमचं लव्हमॅरेजच आहे. पहिल्यांदा भेटल्यापासून ते हाच आपला जोडीदार म्हणून योग्य आहे हे ठरवण्याच्या प्रोसेसदरम्यान आम्ही अनेकदा एकमेकांना भेटत होतो. त्यावेळी एकमेकांचे स्वभाव कळले. वैयक्तिक आयुष्यासंबंधित गोष्टींचं गुपित ठेवायला मला आवडतं. त्यामुळे गेलं दीड वर्ष मी हे नातं सर्वांपासून लपवून ठेवलं". पूजा पुढे म्हणते,"सिद्धेश मला क्लिक झाला असा एक क्षण सांगता येणार नाही..असे अनेक क्षण आले. पहिल्या भेटीतच मला सिद्धेश आवडला होता. स्थळ आल्यानंतर पहिला फोन मी त्याला केला होता. पुढे हळूहळू सिद्धेशचा स्वभाव कळला. तो प्रचंड सपोर्टिव्ह आहे. तसेच कायमच माझ्या पाठिशी आहे. सिद्धेशसोबत घालवलेल्या प्रत्येक क्षणाला मला वाटत होतं की हाच माझ्यासाठी योग्य जोडीदार आहे".




# चेंगराचेंगरीनंतर RCB कडून अधिकृत निवेदन!

## मृतांच्या नातेवाईकांसाठी 10 लाखांची नुकसानभरपाई जाहीर

। नवी दिल्ली।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**१८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आयपीएलचे विजेतेपद मिळवलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे स्वागत करण्यासाठी बुधवारी (४ जून) लाखोंच्या संख्येत त्यांचा चाहता वर्ग बंगळुरूच्या रस्त्यावर जमला होता. मात्र, या उत्सवाला गालबोट लागले. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी मैदानाबाहेर गर्दी आटोक्याच्या बाहेर गेली आणि चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. दरम्यान, चेंगराचेंगरीत मृत झालेल्या लोकांच्या नातेवाईकांना आरसीबीने आता १० लाखांची नुकसान भरपाई जाहीर केली आहे. यासंदर्भात त्यांनी आज अधिकृत सोशल मिडिया पोस्ट केली.**




काल बेंगळुरूमध्ये घडलेल्या दुर्दैवी घटनेने आरसीबी कुटुंबाला खूप वेदना आणि वेदना झाल्या आहेत, असं आरसीबीने त्यांच्या निवेदनात म्हटलं आहे. "आदर आणि एकतेचे प्रतीक म्हणून, आरसीबीने ११ मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. याशिवाय, या दुःखद घटनेत जखमी झालेल्या चाहत्यांना मदत करण्यासाठी आरसीबी केअर्स नावाचा एक निधी देखील तयार केला जात आहे. आमचे चाहते नेहमीच आमच्या प्रत्येक कृतीच्या केंद्रस्थानी राहतील", असंही आरसीबीने पुढे निवेदनात म्हटलं आहे.गर्दीचं नियोजन करता न आल्याने येथे चेंगराचेंगरी झाली आणि ११ जणांचा मृत्यू झाल्याचं म्हटलं जातंय. हा कार्यक्रम वैध पास असलेल्या लोकांसाठी होता, परंतु मोफत पास मिळत असल्याची अफवा पसरली आणि स्टेडिअमच्या गेटवर प्रचंड गर्दी झाली. या गर्दीत ११ जणांचा मृत्यू झाला. या स्टेडिअमची ३५ हजार लोकांचीच क्षमता होती. मात्र, येथे अडीच ते तीन लाखांहून अधिक लोक एकाचवेळी जमल्याने गोंधळ उडाला. त्यामुळे या गर्दीचं नियोजन करताना प्रशासनाची दमछाक झाली.एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या चेंगराचेंगरीची घटना विजयी परेडविषयीच्या परस्परविरोधी विधानांमुळे घडली असे अनेकांचे सांगणे आहे. आरसीबी संघाच्या व्यवस्थापनाने सायंकाळी ५ वाजता विजयी परेड आयोजित करण्याची घोषणा केली. त्यांच्या 'एक्स'वरील पोस्टमध्ये सांगण्यात आले, "चिन्नास्वामी स्टेडियममध्ये विजयी परेडनंतर उत्सव साजरा केला जाईल. आम्ही सर्व चाहत्यांना पोलिस आणि इतर अधिकाऱ्यांनी ठरवलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याची विनंती करतो. SHOP.ROYALCHALLENGERS.COM वर मोफत पास (मर्यादित प्रवेश) उपलब्ध आहेत," असे त्यात सांगण्यात आले होते. परंतु, बंगळुरू पोलिसांनी यापूर्वीच सांगितले होते की, विजयी परेड होणार नाही. या परस्परविरोधी विधानांमुळे आरसीबी संघाबरोबर विजय साजरा करण्यासाठी स्टेडियमबाहेर लोकांची मोठी गर्दी जमली, असा अंदाज आहे. काल बेंगळुरूमध्ये घडलेल्या दुर्दैवी घटनेने आरसीबी कुटुंबाला खूप वेदना आणि वेदना झाल्या आहेत, असं आरसीबीने त्यांच्या निवेदनात म्हटलं आहे. "आदर आणि एकतेचे प्रतीक म्हणून, आरसीबीने ११ मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. याशिवाय, या दुःखद घटनेत जखमी झालेल्या चाहत्यांना मदत करण्यासाठी आरसीबी केअर्स नावाचा एक निधी देखील तयार केला जात आहे. आमचे चाहते नेहमीच आमच्या प्रत्येक कृतीच्या केंद्रस्थानी राहतील", असंही आरसीबीने पुढे निवेदनात म्हटलं आहे.गर्दीचं नियोजन करता न आल्याने येथे चेंगराचेंगरी झाली आणि ११ जणांचा मृत्यू झाल्याचं म्हटलं जातंय.

### नियोजन करताना प्रशासनाची दमछाक

हा कार्यक्रम वैध पास असलेल्या लोकांसाठी होता, परंतु मोफत पास मिळत असल्याची अफवा पसरली आणि स्टेडिअमच्या गेटवर प्रचंड गर्दी झाली. या गर्दीत ११ जणांचा मृत्यू झाला. या स्टेडिअमची ३५ हजार लोकांचीच क्षमता होती. मात्र, येथे अडीच ते तीन लाखांहून अधिक लोक एकाचवेळी जमल्याने गोंधळ उडाला. त्यामुळे या गर्दीचं नियोजन करताना प्रशासनाची दमछाक झाली.एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये झालेल्या चेंगराचेंगरीची घटना विजयी परेडविषयीच्या परस्परविरोधी विधानांमुळे घडली असे अनेकांचे सांगणे आहे. आरसीबी संघाच्या व्यवस्थापनाने सायंकाळी ५ वाजता विजयी परेड आयोजित करण्याची घोषणा केली. त्यांच्या 'एक्स'वरील पोस्टमध्ये सांगण्यात आले, "चिन्नास्वामी स्टेडियममध्ये विजयी परेडनंतर उत्सव साजरा केला जाईल.SHOP.ROYALCHALLENGERS.COM वर मोफत पास (मर्यादित प्रवेश) उपलब्ध आहेत," असे त्यात सांगण्यात आले होते.

# श्रीलंकेचा माजी खेळाडू अडचणीत!

## टी –20 वर्ल्डकपविजेत्या खेळाडूवर मॅच फिक्सिंगचे आरोप

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**श्रीलंकेचा माजी क्रिकेटपटू सचित्रा सेनानायकेवर मॅच फिक्सिंगमध्ये सहभागी असल्याचा आरोपावरून दोषी ठरवण्यात आले आहे. लंका प्रीमियर लीग स्पर्धेतील २०२० मध्ये झालेल्या हंगामात त्याने आपल्या सहकारी खेळाडूला आमीष दाखवण्याचा प्रयत्न केल्याबद्दल हंबनटोटा उच्च न्यायालयाने आरोपपत्र दाखल केले आहे. तो या स्पर्धेत खेळत नव्हता. ज्यावेळी ही स्पर्धा सुरू होती त्यावेळी तो परदेशात होता. परदेशातून त्याने मॅच फिक्सिंगसाठी खेळाडूशी संपर्क साधला.**




श्रीलंकेतील डेली मिरर या वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार, " सचित्रा सेनानायकेने लंका प्रीमियर लीग स्पर्धेतील पहिल्याच हंगामात सहभागी झालेल्या २ खेळाडूंशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. यासह त्याने दोघांनाही मॅच फिक्सिंगमध्ये सहभागी होण्याचं आमिष दिलं."श्रीलंकेत नवा भ्रष्टाचार विरोधी कायदा लागू करण्यात आला आहे. हा कायदा लागू केल्यानंतर घडलेली ही पहिलीच घटना असल्याचं श्रीलंकेच्या अँटर्नी विभागाने दिलेल्या माहितीत म्हटलं गेलं आहे. सचित्रा सेनानायकेला याआधी २०२३ मध्येही अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्याला जामिनावर सोडण्यात आले आहे. मात्र, त्याच्यावर प्रवास बंदी अजूनही कायम आहे.सचित्रा सेनानायकेने २०१२ ते २०१६ या कालावधीत श्रीलंकेच्या राष्ट्रीय संघाचं प्रतिनिधित्व केलं आहे. यादरम्यान त्याला ४९ एकदिवसीय आणि २४ टी –२० सामने खेळण्याची संधी मिळाली. त्याने आपल्या टी –२० कारकिर्दीत ७८ गडी बाद केले आहेत. यासह तो २०१४ मध्ये श्रीलंकेच्या टी –२० वर्ल्डकविजेत्या संघाचा भाग होता.सचित्रा सेनानायकेच्या क्रिकेट कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं तर, त्याला २०१२ मध्ये श्रीलंकेकडून पदार्पण करण्याची संधी मिळाली. यादरम्यान त्याला १ कसोटी सामना खेळण्याची संधी मिळाली. ज्यात त्याला एकही गडी बाद करता आला नाही. त्याच्या वनडे कारकिर्दीबद्दल बोलायचं झालं, तर त्याने ४९ सामन्यांमध्ये ५३ गडी बाद केले आहेत. तर २४ टी–२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये त्याने २५ गडी बाद केले आहेत. आयपीएल स्पर्धेतील ८ सामन्यांमध्ये त्याला ९ गडी बाद करता आले आहेत.

### सेनानायकेवर प्रवास बंदी

हा कायदा लागू केल्यानंतर घडलेली ही पहिलीच घटना असल्याचं श्रीलंकेच्या अँटर्नी विभागाने दिलेल्या माहितीत म्हटलं गेलं आहे. सचित्रा सेनानायकेला याआधी २०२३ मध्येही अटक करण्यात आली होती. त्यानंतर त्याला जामिनावर सोडण्यात आले आहे. मात्र, त्याच्यावर प्रवास बंदी अजूनही कायम आहे.

श्रीलंकेतील डेली मिरर या वृत्तपत्राने दिलेल्या वृत्तानुसार, " सचित्रा सेनानायकेने लंका प्रीमियर लीग स्पर्धेतील पहिल्याच हंगामात सहभागी झालेल्या २ खेळाडूंशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधला. यासह त्याने दोघांनाही मॅच फिक्सिंगमध्ये सहभागी होण्याचं आमिष दिलं."श्रीलंकेत नवा भ्रष्टाचार विरोधी कायदा लागू करण्यात आला आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
ePaper
।शुक्रवार ।
। दि. 6 जून 2025।
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# एस. बी. पाटील पब्लिक स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी केले वृक्षारोपण!

## शिक्षण विश्व; पर्यावरण दिनानिमित्त वसुंधरेच्या संवर्धनाचा जागर




। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी । महाईन्यूज ।

**जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील एस. बी. पाटील पब्लिक स्कूलच्या पटांगणात माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण केले. वसुंधरेच्या संवर्धनासाठी आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आणि त्याचे संगोपन हाच एकमेव उपाय असल्याचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.**

‘प्लास्टिकच्या प्रदूषणाचा अंत’ ही या वर्षाची संकल्पना होती. यामध्ये “पृथ्वी आमच्या वर्गात आहे” ही स्वरचित कविता विद्यार्थ्यांनी सादर केली. पॉवरपॉईंट द्वारे वातावरणातील संभाव्य धोके आणि उपाययोजना याचे सादरीकरण केले. ‘एक पेड माँ के नाम’ या सीबीएससीच्या मोहिमेअंतर्गत भारत सरकारच्या उपक्रमाची माहिती देण्यात आली आणि याविषयावर मनोरंजक प्रश्नमंजुषा घेण्यात आली. अशा उपक्रमामुळे पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न निश्चितच यशस्वी होईल असे प्राचार्या डॉ. बिंदू सैनी यांनी सांगितले. यावेळी उपप्राचार्या पद्मावती बंडा, मुख्याध्यपिका शुभांगी कुलकर्णी, समन्वयिका निरुपमा काळे, वंदना सांगळे, दर्शन कामत, अर्चना प्रभुणे, सुप्रिया नितीन, सुजाता भोईटे, क्रांती कुलकर्णी व शिक्षकवर्ग उपस्थित होते. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विद्यार्थी व शिक्षकांना शुभेच्छा देऊन या उपक्रमाचे कौतुक केले.



CERTIFICATION COURSE BY MORAYA SHIKSHAN SANSTHA, CHINCHWAD



शिक्षणाबरोबरच सुसंस्कारित व्यक्तिमत्त्व घडविणारी शाळा

2025-26
ADMISSIONS
OPEN

प्रज्ज्वलितो ज्ञानमयो प्रदीपः

"यत् भावो – तत् भवति"

# मोरया शिक्षण संस्था, चिंचवड
# डिप्लोमा इन मॉन्टेसरी आणि नर्सरी शिक्षक प्रशिक्षण






* राष्ट्रीय स्तरावर वैध प्रमाणपत्र
* प्रात्यक्षिकवर भर,
* ग्रंथालय सुविधा
* अध्यापन शास्त्राबद्दलची माहिती
* बाल मानसशास्त्र व पोषण आणि खूप काही..

* शुल्क: १६,०००/- (२ हप्त्यांसह)
* १ सेमिस्टर कोर्स
* अभ्यासक्रम कालावधी: १५ जून २०२५ ते १५ डिसेंबर २०२५
* वेळ : सकाळी १० ते दुपारी २

प्लॉट क्र. 13, मोरया कॉलनी, सुदर्शन नगर, गोलांडे राम मंदिरासमोर, चिंचवड, पुणे 33

संपर्क
सुचित्रा आपटे - ९३२५१३२४०२
भाग्यश्री पंडित - ८०८७७०६१००


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
42
Years of Excellence in Education
EDUCATING MIND & HEART
ADMISSIONS OPEN
FOR AY 2025-26
Holistic Empowering Learning
IT ALL STARTS HERE
42
YEARS OF ENRICHING EXPERIENCE OF EDUCATION
55+
NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS OUR SCHOOLS
11+
CAMPUSES IN AND AROUND PUNE, MAHARASHTRA
17k+
17,000 STUDENTS ACROSS CAMPUSES
600+
TEACHING AND NON TEACHING STAFF
13k+
13,000 ALUMNI ACROSS GLOBE
PRIYADARSHANI GROUP OF SCHOOLS
BHOSARI | INDRAYANI NAGAR | MOSHI | CHAKAN | ALANDI | SHIVAJINAGAR | NANEKARWADI | WANOWRIE | SATARA
+91 8668755826
alandi@priyadarshanischools.org
www.priyadarshanischools.org


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal's
GAYATRI GROUP OF SCHOOLS,
PUNE
ADMISSIONS OPEN
2025-26
PRE-PRIMARY
TO
HIGHER-SECONDARY
For more info
95277 64646 / 77967 67292